Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date – 06 October 2023

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०**

****

- शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याची गरज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून व्यक्त
- कुणबी–मराठा जात प्रमाणपत्रासंदर्भात गठित समितीचा ११ तारखेपासून छत्रपती संभाजीनगर विभागाचा दौरा
- रिझर्व बँकेनं द्वैमासिक पतधोरण जाहीर;सलग चौथ्यांदा रेपो दर जैसे थे कायम

आणि

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची आज एका सुवर्ण, दोन रौप्यसह सहा कांस्य पदकांची कमाई

****

शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करण्याची गरज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. नक्षलवादासंदर्भात उद्‌वलेल्या परिस्थितीबाबत गृह मंत्रालयानं दिल्ली इथं विज्ञान भवनात बोलावलेल्या बैठकीत ते आज बोलत होते. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव मनोज सौनिक, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. गडचिरोलीसारख्या भागातील नक्षलवाद पूर्णपणे संपवण्यात लवकरच यशस्वी होऊ असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. नक्षलवाद्यांना मिळणारी आर्थिक रसद थांबवण्यासाठी वित्तीय गुप्तचर विभागाचा एक संयुक्त गट तयार करून याची सखोल चौकशी करावी अशी विनंतीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. नक्षलग्रस्त भागात रेल्वे सेवा वाढवावी, जखमी पोलिसांवर तातडीने उपचार करण्यासाठी रात्री हेलिकॉप्टर

उतरवण्याची परवानगी मिळावी अशी मागणीही मुख्यमंत्र्यांनी केली. तसंच याठिकाणी सुरू असलेल्या विकास कामांचा आढावा मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी घेतला.

****

मराठा–कुणबी, कुणबी–मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यासाठी गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे आणि अन्य समिती सदस्य येत्या ११ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर २०२३ याकालावधीत छत्रपती संभाजीनगर विभागाचा जिल्हानिहाय दौरा करणार आहेत. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात विभागीय आयुक्तांना पत्र पाठवून माहिती दिली. समितीची पहिली बैठक छत्रपती संभाजीनगर इथं ११ ऑक्टोबरला, जालना १२ ऑक्टोबर, परभणी १६, हिंगोली १७, नांदेड १८, लातूर २१, धाराशिव २२ तर बीड इथं २३ ऑक्टोबरला सकाळी समितीची बैठक होणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय आयुक्त कार्यालयात तर इतर ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयात निर्धारित दिवशी सकाळी ११ वाजता ही बैठक होईल. जिल्ह्यातील पात्र नागरिकांनी त्यांच्याकडील उपलब्ध निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजाम काळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, तसंच राष्ट्रीय दस्तावेज या बैठकीदरम्यान समितीला उपलब्ध करुन देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला सार्वजनिक रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त नसल्याची खात्री करण्यास सांगितलं आहे. मुख्य न्यायमूर्ती डी.के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती डॉक्टर आरिफ यांच्या पीठाने महाराष्ट्र वैद्यकीय आणि साहित्य खरेदी कायद्यांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची दोन आठवड्यांत नियुक्ती करण्याचे निर्देश राज्याला दिले आहेत. नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या दोन सरकारी रुग्णालयात दोन दिवसांत रुग्णांच्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या मृत्यूची स्वत:हून दखल घेत न्यायालय या प्रकरणाची सुनावणी करत आहे. न्यायालयाने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण आणि औषधी विभागाच्या प्रधान सचिवांना सर्व सरकारी रुग्णालयांमधील मंजूर पदं आणि या पदांवर भरलेल्या रिक्त पदांची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितलं आहे.

****

भारतीय रिझर्व बँकेनं आज द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. यामध्ये रेपो दरात कोणताही बदल न करता, तो साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. मुंबईत झालेल्या बँकेच्या पतधोरण समितीच्या द्वैमासिक आढावा बैठकीनंतर, गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज ही माहिती दिली. सलग चौथ्यांदा रेपो दरात कोणताही बदल करण्यात आला नाही. भारत जगाच्या विकासाचं केंद्र बनत असल्याचं दास यांनी यावेळी सांगितलं. यंदाच्या आर्थिक वर्षात महागाई दर पाच पूर्णांक चार टक्के राहण्याचा अंदाज दास यांनी व्यक्त केला आहे.

****

जी-20 देशांच्या संसदेच्या अध्यक्षांची नववी परिषद या महिन्याच्या १३ आणि १४ तारखेला नवी दिल्ली इथं होणार आहे. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज नवी दिल्लीत ही माहिती दिली. एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्यासाठी संसद हे या परिषदेचं घोषवाक्य आहे. या परिषदेत ५० पीठासीन अधिकारी आरोग्य, शिक्षण, कृषी, ऊर्जा आणि हवामान बदलावर चर्चा करणार आहेत.

****

मराठी भाषेचं संवर्धन आणि जतन होण्याची गरज भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली आहे. नागपूर इथं विभागीय आयुक्त कार्यालयात भाषा सल्लागार समितीच्या बैठकीत ते आज बोलत होते. शब्दकोश कालबाह्य होत नसून त्यात नवनवीन शब्दांची भर पडत असते. अद्ययावत शब्दकोश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत यंत्रणेने त्याची संगणकीय प्रत उपलब्ध करून दिली पाहिजे, असं मत देशमुख यांनी यावेळी व्यक्त केलं. भाषेच्या संवर्धनासाठी समितीनं पुढं यावं. राजभाषा अधिनियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करून सर्व मेट्रो स्थानकांची नावे मराठीत करावी. मराठी भाषा अभिव्यक्तीसाठी नवीन परिभाषा निर्माण, तसेच जुना परिभाषा कोश अद्यावत करण्यावर भर द्यावा, अशा सूचना बैठकीमध्ये देण्यात आल्या.

****

चीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आज २२ वं सुवर्ण पदक पटकावलं. पुरुष हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघानं जपानच्या संघाचा पाच एकने पराभव केला. या व्यतिरिक्त भारताने आज पाच कांस्य पदकांची कमाई केली. तिरंदाजीत महिलांच्या संघानं रिकर्व्ह प्रकारात कांस्य पदक जिंकलं. अंकिता

भाकत, सिमरनजित आणि भजन कौर यांच्या चमूनं व्हिएतनाम संघाचा पराभव केला. बॅडमिंटनमध्ये एच एस प्रणॉयनं कांस्य पदक मिळवलं. फ्रीस्टाइल कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमनने, महिलांच्या ७६ किलो वजनी गटात किरणने आणि महिलांच्या ६२ किलो वजनी गटात सोनमने कांस्यपदक पटकावलं. पुरुषांच्या कबड्डीच्या अंतिम फेरीत भारताने पाकिस्तानला पराभूत करत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. तर क्रिकेट मध्ये भारतीय पुरुष संघाने बांगलादेश चा नऊ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे.

आज भारताने एक सुवर्ण, दोन रौप्य तर सहा कांस्य पदकं पटकावली. आतापर्यंत या स्पर्धेत २२ सुवर्ण, ३४ रौप्य तर ३९ कांस्य पदकांसह एकूण ९५ पदकं मिळवत भारत पदकतालिकेत चौथ्या क्रमांकावर कायम आहे.

****

मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत आज सिंधुदुर्गनगरी इथं आज अमृत कलश यात्रा काढण्यात आली. जिल्ह्यातल्या सर्व आठही नागरी भागातील मातीने भरलेल्या अमृत कलशांचं सिंधुदुर्ग नगरी इथं आगमन झाल्यानंतर जिल्हाधिकारी किशोर तावडे यांच्या उपस्थितीत सर्व कलशांतील माती जिल्हास्तरीय कलशात एकत्रित करण्यात आली. यावेळी उपस्थितांना पंचप्रण शपथ देण्यात आली.

****

आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त धुळे शहरात अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत आज प्रभातफेरी आणि तृणधान्य मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं. यावेळी प्रभातफेरीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांनी मोठ्या संख्येनं सहभाग नोंदवला.

****

टोमॅटो तसंच कांद्याचे भाव वाढलेले असताना त्यांच्यावर नियंत्रण आणणाऱ्या केंद्र सरकारने या दोन्ही पिकांचे भाव पडलेले असताना शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी काय उपाययोजना केल्या असा प्रश्न विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विचारला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगी जिल्ह्यात पैठण तालुक्यातील लोहगाव इथं होऊ द्या चर्चा या कार्यक्रमात ते बोलत होते.

****

वर्धा जिल्ह्यातून भारतीय जनता पक्षाच्या वतीनं काढण्यात आलेली इतर मागास वर्ग–ओबीसी जागर यात्रा आज गोंदिया इथं पोहोचली. याठिकाणी बाईक रॅली काढून यात्रेचं स्वागत करण्यात आलं. त्यानंतर ओबीसी जागर सभा घेण्यात आली. यावेळी भाजपचे माजी आमदार आशिष देशमुख यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

****

बुलडाणा जिल्ह्यातल्या धाड रस्त्यावरील दुधा घाटात राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसला घाटात कोसळल्यामुळे अपघात झाला. ही बस मलकापूरहून छत्रपती संभाजीनगरकडे येत होती. दुधा घाटात चालकाचं बसवरील नियंत्रण सुटल्यामुळे बस घाटात कोसळली. परंतु, २० ते २५ फुटावर असलेल्या एका झाडात बस अडकल्यामुळे बसमधील सर्व प्रवाशांचा जीव वाचला, मात्र १३ प्रवासी जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच तात्काळ बसमधील प्रवाशांना नागरिकांच्या मदतीनं बाहेर काढण्यात आलं असून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****